7 MAY 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : डॉ. सी. एच. भोसले यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. शिंदे.

# डॉ. भोसले यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील डॉ. चंद्रकांत भोसले यांना मराठी विज्ञान परिषदेचा विशेष मार्गदर्शक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. त्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला.

मराठी विज्ञान परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या विज्ञान संशोधन पुरस्कार-२०१६ स्पर्धेसाठी डॉ. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली 'साखर कारखान्यात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे उत्प्रेरकाच्या मदतीने नैसर्गिक सूर्यप्रकाशाद्वारे विघटन' या विषयावरील संशोधन प्रकल्प सादर करण्यात आला. हा प्रकल्प परिषदेच्या लीला परशुराम आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कारासाठी पात्र ठरला. याबद्दल मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात डॉ. भोसले यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन रिसर्च या संस्थेतील प्रा. मिलिंद वाटवे यांच्या हस्ते मार्गदर्शक पुरस्कार प्रदान केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
- 7 MAY 2017
सकाळ

# प्रवेश परीक्षा ऑफलाइन

कोल्हापूर, तां. ६ : शिवाजी विद्यापीठातर्फे झालेली प्रवेश परीक्षा ४२७ विद्यार्थ्यांनी आज दिली. ही परीक्षा ऑफलाइन पद्धतीने झाली. विषय व परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अशी : बी. लीब. अँड इन्फर्मेशन सायन्स (२), एम. लिब. अँड इन्फर्मेशन सायन्स (०), मायक्रोबॉयोलॉजी (१२९), मॅथेमॅटिक्स (१४२), भूगर्भशास्त्र (१३), एम. बी. ए. (एक्झिक्युटिव्ह, दूरशिक्षण विभाग) (७), स्टॅटिस्टिक्स (७२), फिजिक्स (६२).

- 7 MAY 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलताना प्रा. चंद्रकुमार नलगे. शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर व अन्य मान्यवर.

# श्रमातून व्यक्तीचे चारित्र्य घडते : प्रा. चंद्रकुमार नलगे

कोल्हापूर, ता. ६ : श्रमातून व्यक्तीचे चारित्र्य घडते, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त आयोजित आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्रा. नलगे म्हणाले, "स्वप्नपूर्ती करण्यासाठी अखंड परिश्रमाची आवश्यकता असते. श्रम संस्काराशिवाय मनुष्याला थोरपण प्राप्त होत नाही. या तत्त्वाची पायाभरणी डॉ. पवार यांनी विद्यापीठात केली. त्यासाठी 'कमवा व शिका' ही योजना राबवली. या योजनेतून हजारो चारित्र्यवान विद्यार्थी घडले पाहिजेत."

डॉ. शिर्के म्हणाले, "डॉ. पवार यांच्या विचाराचा वसा आणि वारसा प्रत्येक विद्यार्थ्याने कृतीतून जपला पाहिजे." या वेळी 'कमवा व शिका' योजनेतून शिक्षण घेणारे गुणवंत विद्यार्थी दीपक पाडवी, मनीषा पाटील, पूजा जाधव, पल्लवी मेहता, सुप्रिया खेगडे, नमिता गावडे, रेश्मा बाबर, आसमा सय्यद, रेवणनाथ नवले यांचा सत्कार झाला. तसेच भवनचे माजी विद्यार्थी डॉ. सी. एच. भोसले यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, माजी शिक्षण संचालक डॉ. एस. एन. पठाण, प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, माजी कामगार आयुक्त अंकुश मोरे, प्राचार्य विठ्ठल लिपारे, प्राचार्य डॉ. मानसिंग जगताप, युवराज कदम, प्रा. किसन कुराडे, प्रा. अनुराधा गुरव, डॉ. संभाजी शिंदे उपस्थित होते. डॉ. बी. एल. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य टी. के. सरगर यांनी परिचय करून दिला. वैभव कांबळे व नीता साठे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. जे. नाईक यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 7 MAY 2017
लोकमत

# आप्पासाहेब पवार यांनी अनेकांचे आयुष्य उभारले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी 'कमवा व शिका' योजनेतून अनेकांचे आयुष्य उभारले. त्यांच्यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची संधी मिळाली, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांनी शुक्रवारी येथे केले.

डॉ. पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका प्रबोधिनी' आणि डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनतर्फे आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कमवा व शिका' योजनेत सहभागी होऊन आपले शिक्षण पूर्ण करावे. कार्यक्रमास नीता साठे, वैभव कांबळे, आदी उपस्थित होते.